# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /2019-20/2996

दिनांक 27 SEP 2019

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सर्व शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था ,
नागपूर विभाग. नागपूर

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2019-20 करिता महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयांचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल/2926/ दि. 23/09/2019.

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2019-20 करिता, **"राज्य महाडिबीटी पोर्टल"** (State DBT Portal) वर खालील प्रमाणे शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येत आहे.

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
2. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
3. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना

सदर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज महाडीबीटी पोर्टल वर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सादर करण्यांत आलेले अर्ज, संस्थेतील प्राचार्य व क्लर्क, यांच्या लॉगिन मधुन काटेकोरपणे तपासणी करुन विभागीय कार्यालयास ऑनलाईन सादर करण्यांबाबत संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत आलेले होते. परंतु असे निदर्शनास आले आहे की, संस्था स्तरावरील दोन्ही लॉगीनमधुन विद्यार्थ्यांचे अर्ज कटाक्षाने छाननी न करता अपुर्ण कागदपत्रा अभावि विद्यार्थीचे अर्ज विभागीय कार्यालयास मंजुरीस पाठविण्यांत येत आहे. त्यामुळे तपासणी समितीचा बराच वेळ वाया जात आहे.

**आपणांस या व्दारे कळविण्यांत येते की, लाभार्थी विद्यार्थ्याचे अर्ज कटाक्षाने तपासणी करुन पुर्ण कागदपत्रासह अर्ज विभागीय कार्यालयास मंजुरी करिता दि. 10/10/2019 पर्यंत पाठविण्यांत यावे. अन्यथा अपूर्ण असलेले विद्यार्थ्याचे अर्ज थेट नामंजूर करण्यांत येईल., यांची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

**तसेच लाभार्थी विद्यार्थी सदर योजनेंपासुन वंचित राहिल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.**

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

# राजर्षी छत्रपती शाहूमहाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना:-

* Click to view Benefits & Fee Details Check करणे. (Fee Not Approved असेल तर विद्यार्थ्याला अर्ज Revert करणे)
* Click to View Previous Year Scruitny History मध्ये Department Director चा Remark check करणे त्यामध्ये अर्ज Approved असेल, तर अर्ज Forward for Approved करणे.
* विद्यार्थ्यांचे कॅपलेटर (Admission confirmation letter).
* विद्यार्थ्याने चालु वर्षाची फी पावती जोडण्यांत यावी. ( विद्यार्थ्यांचे संस्थेचे बोनाफाईड ग्राहय धरण्यांत येणार नाही.)
* विद्यार्थ्यांच्या कुंटुबाचे (आई व वडील दोन्ही मिळुन) उत्पन्न मर्यादा रु. 8 लाखा पर्यंत लागु राहील.
* उत्पन्नाचा दाखला (2018-19) हा संबंधित तहसिलदार,नायब तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी (SDO) यांच्या स्वाक्षरीचा असावा.
* डोमिसाईल सर्टीफिकेट, हे संबंधित तहसिलदार,नायब तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी (SDO) यांच्या स्वाक्षरीचा असावा.
* दिलेल्या साध्या पेपरवर वडीलांचे कुटुंब मर्यादा हमीपत्र अपलोड करण्यांत यावे.
* सदर योजना ही कुंटूबांतील कोणत्याही दोन अपत्यापुरती मर्यादित आहे. जर विद्यार्थी हा तिसरा अपत्य असेल तर कोणत्याही दोन अपत्यांनी शिष्यवृत्ती घेतली अथवा नाही, याबाबतचे संबंधित शाळेचे प्रमाणपत्र अपलोड करण्यांत यावे. (जर विद्यार्थ्यांने शिष्यवृत्ती घेतली असेल तर त्या विद्यार्थ्यांला सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.)
* ज्या विद्यार्थ्यांचे वडील हयात नसतील, तर वडीलांचे मृत्युप्रमाण पत्र सादर करावे. अशा वेळेस विद्यार्थ्यांच्या आईचेउत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यांत येईल.तसेच आई व वडील दोन्ही हयात नसतील,अशा विद्यार्थ्यांच्या संबंधित पालकांचे उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यांत येईल. तसेच अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी Gaurdianम्हणुन त्यांनी रु.100/-स्टॅपपेपरवर हमीपत्र सादर करावे.
* संबंधित शैक्षणिक कागदपत्रे जसे- Marksheet, Gap certificate.
* इयत्ता 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्याने पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल व सदर विद्यार्थ्याने इयत्ता 11 व 12 वी मध्ये इबीसी योजनेचा लाभ घेतला नसेल, तर लाभ देण्यांत यावा तसे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांचे प्रमुखांकडुन प्राप्त करुन घ्यावे. लाभ घेतला असेल तर लाभ देउ नये.

## डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता:-

* वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे.
* विद्यार्थ्यांच्या पालकांचे अल्पभुधारक प्रमाणपत्र हे तहसिलदार,नायब तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी (SDO) यांच्या स्वाक्षरीचा असावा. अथवा विद्यार्थ्यांचे पालक हे रोजगार हमी कायदा अंतर्गत नोंदणीकृत मजदूर असावा.
* विद्यार्थी हा वसतिगृह मध्ये राहत असल्याचे प्रमाणपत्र तसेच विद्यार्थी जर भाडयांनी राहत असल्यास घर-मालकांचे 100 रु. स्टॅपपेपर वर हमीपत्र (Rent Agreement)सादर करावे.
* जर विद्यार्थ्यांचे पालक हे अल्पभुधारक शेतकरी अथवा नोंदणीकृत मजदूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुंटुबांचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. 1 लाख पर्यंत अथवा त्यापेक्षा कमी आहे, असा विद्यार्थी या योजनेंस पात्र राहील.

## अल्पसंख्याक शिष्यवृत्ती

* विद्यार्थ्याला केंद्रीय प्रवेश प्रक्रिया / संस्था स्तराद्वारे प्रवेश दिला जावा. (संस्थेचे बोनाफाईड सर्टीफिकेट) सादर करावे.
* अल्पसंख्यांक समुदायातील (मुस्लिम, बौद्ध, खिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू समुदाय) नमुद असलेले 100 रु. स्टॅपपेपर वर हमीपत्र सादर करावे. तसेच त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या कुंटुबाचे (आई व वडील दोन्ही मिळुन) उत्पन्न मर्यादा रु. 8 लाखा पर्यंत नमुद असणे आवश्यक आहे. पालकांचे उत्पन्न सदर हमीपत्रात नमुद नसल्यास उत्पन्न दाखला सादर करावा.
* विद्यार्थ्यांने महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर